# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.06.2025** **वार:शुक्रवार**

1. ॲक्सिओम फोर मोहिमेद्वारे शुभांशु शुक्ला यांच्या रूपानं पहिला भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात दाखल
2. राज्यात वीजदरात टप्प्याटप्प्यानं 5 वर्षात 26 टक्के कपात होणार, सुधारित दर येत्या 1 जुलैपासून लागू
3. राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून मुंबईत आणि
4. राज्यात यंदाच्या खरीप हंगामात आत्तापर्यंत 23 टक्के पेरण्या पूर्ण

**ॲक्सिओम**

ॲक्सिओम फोर या मोहिमेअंतर्गत भारतीय वायू दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह 4 अंतराळवीरांना घेऊन निघालेलं स्पेसएक्स ड्रॅगन हे अंतराळयान काल दुपारी 4 वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचलं. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारे पहिले भारतीय ठरले आहेत. ऐकुया एक वृत्तांत .....

**ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्या रूपानं दुसरा भारतीय अंतराळवीर अवकाशात पोहोचला आहे, 1984 मध्ये राकेश शर्मा अंतराळात जाणारे पहिले भारतीय ठरले होते; त्यांच्यानंतर 41 वर्षांनी भारतीय अंतराळवीर अंतराळात पोहोचला आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचणारा पहिला भारतीय अंतराळवीर होण्याचा बहुमानही शुभांशू शुक्ला यांना मिळाला आहे. या ऐतिहासिक मोहिमेत भारताबरोबरच अमेरिका, पोलंड आणि हंगेरीचे अंतराळवीर 14 दिवस अंतराळ स्थानकात राहून गुरुत्वाकर्षण, किरणोत्सार, अवकाशातील बीजरोपण या संदर्भातील विविध प्रयोग करणार आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर यशस्वीरित्या डॉकिंग केल्याबद्दल केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी शुभांशू शुक्ला आणि ॲक्सिओम-फोर मिशनमधील अन्य अंतराळवीरांचं अभिनंदन केलं आहे.....**

**भारतीय मूल का अंतरिक्ष यात्री इंटरनॅशनल स्पेस स्टेशन पर भारत के लिए गर्व की बात है और साथ ही साथ लग की अवसर प्रकट करने का भी देश के राजनैतिक नेतृत्व का प्रधानमंत्री मोदी जी का जिस प्रकार का अनुकूलता कामकाज के वातावरण में आई उसके कारण ये संभव हो पाया।**

**ॲक्सिओम-4 मोहीमेच्या रूपानं अंतराळ क्षेत्रात भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून या क्षेत्रातील भारताच्या क्षमतेचं दर्शन अवघ्या जगाला पुन्हा एकदा झालं आहे.**

**वीज कपात-मुंबई**

राज्यात प्रथमच वीजग्राहकांना दरकपात मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. वीजदरकपात करण्यासाठी महावितरणनं केलेल्या याचिकेवर राज्य वीज नियामक आयोगानं दिलेल्या निकालानुसार, वीजदरात टप्प्याटप्प्यानं 5 वर्षात 26 टक्के कपात केली जाईल. सुधारित दर येत्या 1 जुलैपासून लागू होतील. पहिल्या वर्षी 10 टक्के कपात होणार आहे. भविष्यातल्या वीज खरेदीत सौर ऊर्जा आणि हरित ऊर्जेवर भर दिल्यामुळे वीजखर्चात बचत होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. दरमहा 10 युनिटपेक्षा कमी वापर करणाऱ्या ग्राहकांना या दरकपातीचा जास्त फायदा होईल, असं सांगून फडणवीस म्हणाले.....

**आजचा दर आहे दहा रुपये अड्डयाऐंशी पैसे आणि पाच वर्षात तो दर वाढायच्या ऐवजी दहा रुपये अड्डयाऐंशी पैशावरनं नऊ रुपये सत्त्याण्णव पैशांपर्यंत खाली येणार आहे कमर्शियल व्यापारिक दर जो होता हा सोळा रुपये सत्त्याण्णव पैसे आपला दर होता पंधरा रुपये सत्त्याऐंशी पैशाला खाली जाणार आहे म्हणजे पुढचे पाच वर्ष दर न वाढता व्यापारिक दरही कमी होणार आहेत.**

**विधिमंडळ अधिवेशन-मुंबई**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून मुंबईत सुरु होणार आहे. याच कामकाज 18 जुलैपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत काल ही घोषणा करण्यात आली.

**आरएसएस-आणीबाणी**

भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द आणीबाणीच्या काळात समाविष्ट करण्यात आले होते; ते कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेल्या संविधानाचा भाग नव्हते, असं सांगत, याबाबत फेरविचार करावा असं आवाहन राष्ट्रीय स्वयंसवेक संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबाळे यांनी केलं आहे. आणीबाणीला 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त काल नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही या कार्यक्रमाला उपस्थित होते. आणीबाणी हा देशाच्या इतिहासातील एक काळा काळ होता आणि त्यामुळं लाखो लोकांना त्रास सहन करावा लागला, असं गडकरी यावेळी म्हणाले.

**आणीबाणी-लातूर**

आणीबाणीला 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्यातही अनेक उपक्रमांच आयोजन करण्यात आलं आहे; या माध्यमातून त्या काळातील आव्हानात्मक परिस्थितीत लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांना उजाळा देण्यात येत आहे. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात या निमित्तानं आयोजित विशेष प्रदर्शनाचं उद्घाटन प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते काल झालं.

**खरीप पेरण्या**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात आत्तापर्यंत 23 टक्के म्हणजे 33 लाख 59 हजार 81 हेक्टर जमिनीवर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. गेल्या वर्षी याच कालावधीत 19 टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या. राज्यात सर्वांत कमी पेरण्या कोकण विभागात आणि सर्वाधिक पेरण्या पुणे विभागात झाल्या आहेत. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**सोयाबीन हे खरीप हंगामातील मुख्य पीक आहे. सोयाबीनचं राज्यातलं सरासरी क्षेत्र 47 लाख 21 हजार 488 हेक्टर आहे. त्यापैकी 11 लाख 54 हजार 461 हेक्टरवर म्हणजे 24 टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. कपाशीची 27 टक्के क्षेत्रावरची पेरणी पूर्ण झाली आहे. मका या पिकाखालील क्षेत्रातही अलीकडे वाढ होत आहे. मे महिन्यात झालेल्या पावसामुळे; विशेषतः कमी पावसाच्या भागात घेतल्या जाणाऱ्या बाजरीच्या पेरण्यांना फायदा झाल्याचं दिसून येत आहे. जमिनीला वाफसा आला तर राज्याच्या पश्चिम आणि उत्तरेकडील जिल्ह्यांतील पेरणी क्षेत्रातही चांगली वाढ होईल, असं पुणे कृषी आयुक्तालयाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी सांगितलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरु पुणे.**

**घरपट्टी माफ-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात घोटगे गावातल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची पटसंख्या वाढवण्यासाठी सरपंच चैताली ढवळ यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायतीनं पुढाकार घेतला आहे. ऐकुया एक वृत्तांत.....

**गावातली जी मुलं शिक्षणासाठी हायस्कूल आणि शहराच्या ठिकाणी जातात त्यांच्या पालकांनी आपली मुलं गावातल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये पाठवल्यास चालू आर्थिक वर्ष 2025-26 साठीची त्यांची घरपट्टी माफ करण्यात येणार आहे. तसा ठरावचा घोटगे ग्रामपंचायतच्या अलीकडेच झालेल्या मासिक सभेत घेण्यात आला. गावातल्या मराठी**

**शाळा वाचवण्यासाठी असा महत्त्वपूर्ण निर्णय घेणारी घोटगे ग्रामपंचायत ही जिल्ह्यातली पहिलीच ग्रामपंचायत ठरली आहे. मराठी शाळेतली पटसंख्या वाढवण्यासाठी घोटगे ग्रामपंचायतीनं उचललेलं हे महत्त्वपूर्ण पाऊल आहेच पण ग्रामपंचायतीनं घेतलेला हा महत्वपूर्ण निर्णय जिल्ह्यातल्या इतर ग्रामपंचायतीसाठीसुद्धा आदर्शवत ठरला आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.**

**अमली पदार्थ विरोधी दिन**

जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त काल राज्यात सर्वत्र विविध उपक्रम घेण्यात आले. नागपूर, सिंधुदुर्ग, बीडसह विविध जिल्ह्यांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम आणि स्पर्धाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी नागरिकांना अमली पदार्थ विरोधी शपथ देण्यात आली.

**शाहू महाराज जयंती**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या 15व्या जयंतीनिमित्त राज्यभरात काल त्यांना अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन केलं. कोल्हापूरमध्ये पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू महाराज छत्रपती यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या जन्मस्थळी अभिवादन केलं. कालचा दिवस हा सामाजिक न्याय दिवस म्हणूनही साजरा करण्यात येतो. यानिमित्तानं कोल्हापूरसह राज्यात विविध ठिकाणी समता दिंडी काढण्यात आली होती. राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा यंदाचा 'राजर्षी शाहू पुरस्कार' ज्येष्ठ नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना काल कोल्हापूरमध्ये प्रदान करण्यात आला.

**पालखी-सातारा**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचं नीरा स्नानानंतर काल सातारा जिल्ह्यात पाडेगाव इथं आगमन झालं. आज पालखी तरडगावकडे मार्गस्थ होणार असून वाटेत चांदोबाचा लिंब इथं सोहळ्यातील पहिलं गोल रिंगण होणार आहे.

**पोलिस पदक**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काल राजभवन इथं, पोलिस दलातील पदक अलंकरण सोहळा झाला. यावेळी राष्ट्रपतींनी 2021 आणि 2022 या दोन वर्षांच्या स्वातंत्र्य दिनी जाहीर केलेली पोलीस पदकं प्रदान केली.
41 पोलीस अधिकारी आणि जवानांना पोलीस शौर्य पदकं, 3 पोलीस अधिकाऱ्यांना उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक, तर 39 पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदकं प्रदान करण्यात आली.

**कबड्डीसंघ**

हरिद्वारमध्ये होणाऱ्या 18 वर्षाखालील मुलं आणि मुलींच्या पहिल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे दोन्ही संघ जाहीर झाले आहेत. पुणे जिल्ह्यातील सानिका वाकसे मुलींच्या गटाचे, तर परभणीचा जीवन जाधव मुलांच्या संघाचं नेतृत्व करणार आहे. ही स्पर्धा 28 जून ते एक जुलै या कालावधीत होणार आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.